करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
| www.saptahiksandesh.com |
संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२९ | पाने-१२ | दि.०९/०५/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.


Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टॉईज
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
फ्रेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज

लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444) सर्व सुविधा उपलब्ध..!

# रिटेवाडी उपसासिंचनला हिरवा कंदील - सर्वेक्षणाचे आदेश : आमदार पाटील

करमाळा : करमाळा तालुक्यातील कळीचा मुद्दा म्हणून रिटेवाडी उपसासिंचन योजनेकडे पाहिले जात आहे. या सिंचन योजनेला शासन दरबारी हिरवा कंदील मिळाला असून पाटबंधारे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी रिटेवाडी उपसासिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. अशी माहिती आमदार नारायण आबा पाटील यांनी दिली आहे.

रिटेवाडी उपसासिंचन योजना हा माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न असून त्यासाठी आपण सर्व स्तरावरती जोरदार प्रयत्न करत आहोत. याबाबत पाटबंधारे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या संपर्कात होतो. कुकडी कालवा सल्लागार समितीच्या दोन्ही बैठकांना मी उपस्थित होतो.



या दोन्ही बैठकामध्ये रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी ना.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी रिटेवाडी उपसासिंचन योजनेचे सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे या योजनेच्या कामकाजास आरंभ झाला आहे.

सर्वेक्षणानंतर पुढील निर्णयासाठी आपण निश्चितच पाठपुरावा करणार आहोत. कारण रिटेवाडी उपसासिंचन योजना अत्यंत महत्वाची असून करमाळा तालुक्यातील उत्तर भागाचे नंदनवन करण्याची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून हजारो एकर क्षेत्र बागायत होणार आहे.

करमाळा तालुक्यातील विविध प्रश्न आपण सोडवत असून नागरीकांनी सामाजिक व व्यक्तीगत प्रश्नासाठी संपर्कात रहावे किंवा संपर्क कार्यालयात आपले प्रश्न द्यावेत; असेही आवाहन आमदार नारायण (आबा) पाटील यांनी केले आहे.








करमाळा भूषण स्व.गिरधरदासजी देवी प्रणित

## नागरीक संघटना जनहित पॅनल

प्रिय मतदार बंधू-भगिणींनो.., दि करमाळा अर्बन को.ऑप बँक लि; च्या पंचवार्षिक निवडणुकीच्या निमित्ताने पडद्या-मागचे खरे सत्य मी ठळकपणे आपल्या समोर मांडू इच्छितो.

गोरगरीबांच्या हाताला बळकट करण्यासी व सुशिक्षित तरूण बेरोजगारांना व्यावसायिक बनविण्याच्या उद्देशाने करमाळा भूषण आदरणीय स्व.गिधरदासजी देवी यांनी या बँकेची मुहूर्तमेढ रोवली. स्थापनेपासून ते आजपर्यंत फक्त आणि फक्त माणुसकी हा धर्म पाळत अनेकांना कर्जरूपी मदत करून सहकार्य केले. सामाजिक उपक्रम राबविले. सभासदांच्या विश्वासाच्या जोरावर व आपल्या सचोटीबध्द व पारदर्शक कारभारामुळे बँकेच्या अजुन तीन शाखा काढून बँकेचा विस्तार वाढविला. थेंबे थेंबे तळे साचे.. या उक्तीतून भईनी बँकेची स्वत:ची स्थावर निर्माण केली. विशेष बाब म्हणजे बँकेच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त सभासदांना डिव्हीडंड स्वरूपात चांदीच्या मुद्रा देण्यात आल्या.

फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये कोरोना या महामारीचे संकट आले आणि सारे जग ठप्प झाले. संपूर्ण उद्योगधंदे बंद झाले. मानवापुढे फक्त जगण्याचेच आव्हान समोर राहिले. या दोन वर्षाच्या संकट काळात मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी कर्जदारांकडून सक्तीची वसुली करू नका; असे आदेश बँकांना दिले. त्यामुळे या दोन वर्षाच्या काळात बँकेनेही माणुसकीची जाणीव ठेवून कसलीही सक्तीची वसुली केली नाही. त्यामुळे बँकेची थकबाकी वाढत जाऊन रू.२५ कोटी झाली व बँक तोट्यात दिसू लागली.

देशातील सर्वच बँका तोट्यात येणार हे पाहून रिझर्व्ह बँकेने एनपीए वाढलेल्या बँकावर निर्बंध लावले. या निर्णयामुळे ठेवीदारांना खूप मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला. त्याबद्दल मी मनस्वी दिलगिरी व्यक्त करतो. या त्याबद्दल मी मनस्वी दिलगिरी व्यक्त करतो. या काळात सभासदांनी दाखविलेला संयम व विश्वास खूप मोठा आहे. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

रिझर्व्ह बँकेने लावलेले निर्बंध उठविण्यासाठी व बँकेवर आलेल्या संकटाला बाहेर काढण्यासाठी संचालक मंडळाने अथक परिश्रम करून बँकेचे भागभांडवल १२ कोटीने वाढविले व बँकेचा सीआरएआर ही वाढविला व बँकेला या संकटातून पूर्णपणे बाहेर काढले ही वस्तुस्थिती आहे.

आज आपणांस सांगताना अभिमान वाटतो, की.. बँकेची आर्थिक स्थिती मजबुत असून सर्व ठेवीदारांच्या पूर्ण रकमा देण्यास बँक सक्षम असून ठेवीदारांच्या ठेवी देण्यास चालू झाले असून ठेवीदारांनी खरोखर गरज असेल तरच ठेवीचे पैसे काढा अन्यथा रिन्युअल करून

| Particulars | As On 31/3/2022 | As On 31/3/2023 | As On 31/3/2024 | As On 31/3/2025 |
|---|---|---|---|---|
| Paid up Share Capital | 2.62 | 11.93 | 13.95 | 13.95 |
| CRAR % | -39.63 | -23.85 | +52.41 | +236.60 |
| Deposits | 45.82 | 39.03 | 38.90 | 39.11 |
| Investments | 18.98 | 25.57 | 35.81 | 39.90 |
| Advences | 20.49 | 14.81 | 8.17 | 6.42 |
| Gross NPAs (Amount) | 11.29 | 11.77 | 4.57 | 3.84 |
| Net NPAs (Amount) | 6.73 | 6.71 | 0.00 | 0.00 |

तशाच ठेवा. आपल्या ठेवी १००% सुरक्षित असून त्या तुम्हाला पाहिजे तेव्हा परत मिळतील याची मी आपणांस ग्वाही देतो. सर्व बँकींग व्यवहार पूर्ववत चालू झाले आहेत.

छोट्याशा रोपट्याचे आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर करण्यात आदरणीय भईंचा फार मोठा वाटा आहे. हाच मोठा वटवृक्ष सांभाळण्याची फार मोठी जबाबदारी आता तुम्ही पुनश्च: आमच्यावर सोपवाल यात तिळमात्र शंका नाही आणि आम्हीही तुमच्या विश्वासाला तेवढेच पात्र राहू.नागरीक संघटना जनहित पॅनलच्या भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवार श्री.गोरख मच्छिंद्र जाधव यांची बिनविरोध निवड झाली आहे. संघटनेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन ! पॅनलमधील उर्वरित १४ उमेदवारांचे चिन्ह बॅटरी टॉर्च असून या १४ चिन्हा पुढे रबरी फुलीचा शिक्का मारून त्यांनाही प्रचंड बहुमताने विजयी करावे व आपली सेवा करण्याची संधी द्यावी ही नम्र विनंती !

आपला विश्वासू
कन्हैयालाल देवी

आयुष्यात काय मिळवायचे हे आपल्याच हाती असते..

**संपादकीय.........................................!**

# सुखाची अपेक्षा !

परवा प्रवासात दोघजण बोलत होते. त्यांचा संवाद मोठा गंमतीशीर होता. पहिला.. 'काय यार, एका आकड्यामुळे लॉटरी गेली नाहीतर एक कोटी रूपये मिळाले असते !' दुसरा.. 'अरेऽऽ वाईट झाले. तुला झोप आली नसेल नाही का ?' पहिला.. 'हो ना राव ! रात्रभर नुसती तळमळ. आशा मोठी वाईट असते राव..!' दुसरा.. 'हे बघ झालं ते झालं आता पुन्हा तिकीट काढू नकोस !' पहिला.. 'का रे ?' दुसरा.. 'अरेऽऽ यातूनच अॅटॅक येतात, लॉटरी लागलीतरी आणि नाही लागली तरी.. कसे..? ऐक.. एका सुंदर पण गरीब तरूणीला दहा कोटीची लॉटरी लागली. कंपनीला वाटलं, जर या तरूणीला एकदम एवढी लॉटरी लागली असे सांगितले तर तिला अॅटॅक येईल. त्यामुळे त्यांनी एका साधु महाराजाला तिला लॉटरी लागल्याचे तुमच्या शब्दात सांगा व तीला सुरक्षीत ठेवा ! साधु महाराज म्हणाले..'काही काळजी करू नका, मी तिला व्यवस्थित समजावतो.' साधु महाराज त्या मुलीकडे गेले व म्हणाले, ''बघ तुला काही एक लाख रूपये मिळाले तर काय करशील ?' ती म्हणाली की 'मला साड्या घेईन, भारी मोबाईल घेईन, समजा १० लाख दिले तर, मग मी छानसी कार घेईन व आनंदाने राहीन, जर एक कोट रूपये दिले तर, तर मी मोठा बंगला, मोठी गाडी खरेदी करेन आणि समाजकार्याला आर्थिक मदत करेन. महाराज म्हणाले.. आणि जर तुला १० कोट रूपये दिलेतर....? ती मुलगी म्हणाली.. महाराज तुम्ही जर मला दहा कोटी रूपये दिले तर मी त्यातील तुम्हाला निम्मी रक्कम देईन आणि तुमच्याबरोबर लग्न करेन. नक्की.. हो नक्की हे ऐकून महाराजालाच अॅटॅक आला आणि महाराज त्यात गेले. समजलं का..?' पहिला.. 'होऽऽ समजलं बाबा !'

या संवादातून एकच समजले की, प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या बाबतीत अपेक्षा असते. विद्यार्थ्याला पास होण्याबरोबरच पहिला येण्याची, शेतकरी विहीर पाडतो तेंव्हा त्याला दोन-तीन परसातच पाणी लागण्याची, बोअर घेताना लवकर पाणी लागण्याची, इंटरव्हूला गेलेल्या व्यक्तीला जॉबची तर मटके बहाद्दर, जुगार बहाद्दर, लॉटरी बहाद्दर, सट्टा बहाद्दर, गुडगुडी खेळणारे, वादीचा डाव खेळणारे, चिठ्ठी काढून वस्तू मिळवणारे, डब्यात चेंडू टाकून मौल्यवान वस्तू मिळवणारे.. अशा प्रकारातून काही मिळण्याची अपेक्षा ठेवणारे अनेक लोक असतात. वास्तविक पाहता केलेल्या कर्मातून यशाची अपेक्षा ठेवणे श्रेष्ठ, पण बसल्या जागेवर शुन्य मिनीटात श्रीमंत होण्याची आशा म्हणजे तीची सुरवातच निराशात असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

पाऊस न पडता पीक, पाणी न देता झाडाला फळ, अभ्यास न करता परीक्षेत गुण, काहीही मेहनत न करता मोबदला अशा बाबीची अपेक्षा करणे म्हणजे दुःखाला आमंत्रण असते. अनेकांना कष्ट करूनही फळ मिळेलच असे नाही. शेतात कष्ट केल्यानंतर पीक काढताना पाऊस आलातर पीकाची नासधुस होते आणि उत्पन्नाची वाट लागते. शेतकऱ्याच्या आशेची निराशा होते. मग कष्ट न करता यशाची अपेक्षा कशी फलद्रुप होणार ? न्यायालयात अनेकजण येतात, कायद्याचे पाठबळ थोडेफार असते, याबाबीच्या आधारावर केस लढत असतो. त्यात आपल्या बाजूने निकाल लागेल, अशी अपेक्षा असते. यश तर एकालाच मिळणार असते पण दोघालाही यशाची अपेक्षा असते. त्यासाठी वर्षानुवर्षे न्यायालयात संघर्ष चालू असतो. या संघर्षात वेळ, पैसा आणि आयुष्यातील मौल्यवान क्षण चिंता करण्यात वाया जातात. काही वेळा परिवारातील रूग्णांची परिस्थिती खूप गंभीर असते, नंतर आपण मोठ्या हॉस्पीटलमध्ये रूग्णाला घेऊन जातो. डॉक्टर सांगतील ते पर्याय करतो, आपला रूग्ण बरा व्हावा अशी अपेक्षा असते. यातही यश मिळेल असे नाही. याउलट आपण शरीराची वेळच्या वेळी काळजी घेतली, पथ्य पाळली तर आरोग्य चांगले राहिल, पण ते काहीही न करता आरोग्य चांगले रहावे; अशी आशा करणे म्हणजे बिगरपंखाचे हवेत तरंगण्यासारखे असते. त्यामुळे जीवनात प्रयत्न महत्वाचे असतात, अपेक्षा नाही. हे समजले तर आयुष्यात दुःखाला थारा नसतो. बऱ्याच वेळा काही गोष्टी समज नासमजातून घडत असतात.

एका जंगलात एक कावळा राहत होता. आपला दिवस आनंदाने आणि सुखाने घालवत होता. आपण फार सुखी आहोत.. असं त्याला वाटायचे आणि तो त्याच आनंदात जगत होता. पण एक दिवस जंगलातील तळ्याकाठी तो बसलेला असताना त्याला तलावात असलेला राजहंस दिसला. पांढराशुभ्र आणि डौलदार पक्षी पाहून तो हिरमुसला आणि विचार करू लागला.. मी असा काळा कुळकुळीत एकदम आणि हा पक्षी एकदम पांढरा शुभ्र. खरंच हा जगातला सर्वात सुखी पक्षी असावा. मी उगाचच मला सुखी समजत होतो. असा विचार करत तो त्या राजहंसाकडे गेला. त्याला त्यांने आपल्या भावना बोलून दाखविल्या. तो राजहंसही म्हणाला.., खरं आहे मित्रा तुझं, मी ही समजत होतं असं. पण एकेदिवशी मी एका पोपटला पाहिलं. मला एक रंग आहे पण त्याला दोन रंग होते. खरंच तो माझ्यापेक्षा सुखी असणार रे..! मग हा कावळा पोपटाच्या शोधात निघाला. अखेर पोपटला गाठून त्याने सगळी कथा ऐकवली. तो पोपट हसत म्हणाला.., माझाही समज असाच होता, मी स्वतःला खरंच सुखी समजत होतो, पण एकेदिवशी मी एका मोराला पाहिलं आणि मला जाणवलं की तोच खरा सगळ्यात सुखी पक्षी आहे पृथ्वीवर. कारण त्याच्या अंगावर अगणीत रंग आहेत. हे ऐकून कावळा अजून संभ्रमीत झाला आणि मोराच्या शोधात निघाला. त्याला मोर एका प्राणीसंग्रहालयात भेटला. एका पिंजऱ्यात मोर नाचत होता. शेकडो लोक त्याच्या भोवती गोळा होऊन त्याचे गुणगान गात होते. आता मात्र कावळ्याची खात्री पटली, खरंच मोर हा जगातील सर्वात सुखी पक्षी आहे. काही वेळाने सर्व लोक निघून गेल्यावर कावळा मोराच्या पिंजऱ्याजवळ गेला आणि झालेला घटनाक्रम त्याला ऐकवला आणि म्हणाला, मयुरराज आपण खरंच खूप सुंदर आहात. रोज हजारो लोक तुम्हाला पाहयला येतात आणि तुमची स्तुती करतात. मला मात्र कुठं गेलं की हुसकावून लावतात. त्यावर मोर खिन्नपणे हसत म्हणाला, मलाही सगळ्यात सुंदर आणि सुखी पक्षी असल्याचा अभिमान होता. मित्रा पण माझ्या या सौंदर्यामुळे मी पिंजऱ्यात अडकलोय. सगळं प्राणी संग्रालय शोधून बघ. तुला येथे सगळे पक्षी दिसतील, पण कावळा मात्र पिंजऱ्यात दिसणार नाही. त्यामुळे मी असा निष्कर्ष काढतोय सध्या कावळा हा सर्वात सुखी पक्षी आहे. कारण तो त्याच्या मर्जीने कुठेही उडू शकतो आणि जावू शकतो.

ही अपेक्षा कोठून येते तर ती तुमच्यावरील संस्कारातून, संगतीतून व झालेल्या विचारातून येते.एकाच घरात दोन मुलं असतात, त्यातील एकजण चिडखोर तर दुसरा सयंमी असे का..? या प्रश्नाचे उत्तर सुध्दा संस्कार हेच असते. लहाणपणी या मुलांचा सांभाळ कसा झाला, यावर स्वभाव ठरत असतो. बऱ्याचवेळा परिस्थिती संस्कार देत असते. परिस्थितीने मानसं बदलत असतात . एका घरात वडील दारू पित होते. घरात दुःख ,दारिद्रय , भांडण, चिड-चिड सुरू असायची . त्या घरात दोन मुलं होती. एक वडीलाप्रमाणे अट्टल दारूडा बनला तर दुसरा एकदम निर्व्यसनी झाला. असे का..? याचे उत्तर विचार जसा केला तसा आचार आला. एकाने विचार केला बाप दारू पितो कसा मजा पण दुसऱ्याने विचार केला ,नाही वडीलांच्या दारू मुळे घर कसे बरबाद झाले आपण नाही दारू प्यायची . असे दोन विचार कसे आले. त्याचे उत्तर संगत असते. घरातील आई अथवा मित्र अथवा शेजारी यांच्या संस्कारातून विचार धारा बनते व त्यातून जगणं घडतं, त्यातून मन बनतं.

पाणी उताराला धावते, एका जागेवर ठेवलेली वस्तू सडते, माणसाचे मन सुध्दा तसेच कुसंस्काराकडे धावते. त्याला विचाराचा ब्रेक लावावा लागतो. ज्यांनी विचाराचा ब्रेक लावला त्यांना थोडा त्रास झाला पण त्यांना दुःखात पीचत पडावे लागत नाही. ज्यांनी क्षणिक सुखासाठी अविचार केला त्यांचे भविष्य संपले. ज्यांना हा दुष्परिणाम वेळीच समजला व त्यांनी मनावर कोरलातर मन आवरले जाते. ज्याला भविष्याची चिंता असते, त्याचे मन त्याच्या आधिन असते. सभ्य माणसं वेगळी व असभ्य माणसं वेगळी असं असत नाही . माणसं एकच असतात, त्यांची शरिरे सारखीच असतात,कधी कधी ते सारखाच विचार करतात पण एकाला सयंम असतो आणि दुसऱ्याकडे उतावळापणा असतो. एक मनात आलेतरी कृती करत नाही तर दुसरा मात्र कृती करतो आणि आयुष्य बरबाद करून घेतो.

मानसीक भावना सर्वांच्या सारख्या असल्यातरी त्यावर निर्बंध घालणारी माणसं यशस्वी झाल्याचा इतिहास आहे. समाजात संत मंडळीना का किमंत आहे.. कारण तेथे भोगापेक्षा त्यागाला किमंत आहे. समाजात अशीच माणसं वंदनिय ठरलेली आहेत की ज्यांनी समाजासाठी त्याग केला आहे. त्यामुळे आयुष्यात सुखाचे दिवस येण्यासाठी मनात चांगल्या आशा-अकांक्षा ठेवाव्यात. सर्वात महत्वाचे म्हणजे मनावर सुसंकार मिळतील आशा वातावरणात रहावे, संगत चांगली धरावी, वाचन चांगले करावे व श्रमावर अधारीत भविष्याच्या प्रगतीचा विचार करावा. नैसर्गिक आक्रमण आणि संकटं ही विचारून येत नाहीत, अशा स्थितीत सयंम बाळगणं महत्वाचं आहे. मग दुष्काळ असो नाहीतर, न्यायालयातील खटला असो नाहीतर,रूग्णालयातील रूग्ण असो वा अन्य काही. चांगला विचार व चांगले प्रयत्न हेच आपले सामर्थ्य आहे हे विसरून चालणार नाही. यापेक्षा जास्त अपेक्षा काय कामाच्या..!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# शेटे मॅटर्निटी हॉस्पिटल व लॅप्रोस्कोपी सेंटर

करमाळा., जि.सोलापूर आयोजित

# उन्हाळी शस्त्रक्रिया शिबीर

**कालावधी : दि.१५ मे २०२५ ते दि.१७ मे २०२५**

## 50-50 योजना

**दुर्बिणीच्या शस्त्रक्रिया या ५०% सवलतीच्या दरात करण्यात येणार आहेत.**

**सदर योजनेमध्ये खालील शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे केल्या जातील..**

- कुटूंबनियोजन (Lap TL)
- गर्भपिशवी काढणे (TLH)
- अंडाशयाच्या गाठी काढणे (Cystectomy)
- वंध्यत्व तपासणी (Dignostic Hysterolapanicopy)
- कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया पलटविणे (Tuboplasty)
- गर्भाशयाच्या गाठी काढणे (Myomectomy)



**योजनेचे नियम व अटी**

- सदर शस्त्रक्रियासाठी रूग्णांची तसेच शस्त्रक्रिया पूर्वी रक्त तपासण्याला दि.८ मे २०२५ अगोदर पूर्ण होणे आवश्यक आहे.
- दि.१० मे रोजी सदर रूग्णांची यादी अंतिम केली जाईल.
- यादीतील रूग्णांना दि.१५ ते १७ मे दरम्यान जी तारीख देण्यात येणार आहे, त्याच दिवशीच शस्त्रक्रिया करणे बंधनकारक राहील.
- शस्त्रक्रिया पूर्वीच्या तपासण्याचा खर्च सदर योजनेत घेतला जाणार नाही
- केवळ नावनोंदणी असलेल्या ५० रूग्णांना याचा लाभ मिळेल.
- सदर योजनेत शस्त्रक्रिया खर्च, भुलतज्ञ खर्च व मेडिकलचा खर्च अंतर्भुत आहे.
- प्रत्येक शस्त्रक्रियाचा खर्च त्यात असलेल्या क्लेष्ट व गुंतागुंतीवर अवलंबून असल्याने दोन रूग्णांच्या खर्चामध्ये थोडीफार तफावत असू शकते.
- नावनोंदणी तसेच शस्त्रक्रिया पूर्व तपासण्यासाठी रूग्णांनी ८ मे अगोदर ओ.पी.डी.ला येवून भेटणे बंधनकारक राहील.
- योजनेसंबंधी अधिक माहितीसाठी या क्रमांकावर संपर्क साधावा.

**डॉ.विशाल रा. शेटे**
MBBS, DNB (OBST & GYN) F.MAS, F.ART
स्त्रीरोग-प्रसुती व वंध्यत्व तज्ञ
लॅप्रोस्कोपी सर्जन, सोनोग्राफी व हायरिस्क प्रेग्नन्सी तज्ञ

**डॉ.प्रिती वि. शेटे**
MS(Ayu)(OBST & GYN - GOLD MEDAL)
स्त्रीरोग-प्रसुती व वंध्यत्व तज्ञ
हायरिस्क प्रेग्नन्सी व गर्भसंस्कार तज्ञ

पत्ता

## शेटे मॅटर्निटी हॉस्पिटल व लॅप्रोस्कोपी सेंटर

श्री कमलादेवी रोड, ICICI बँकेवर, करमाळा., जि.सोलापूर.

**नावनोंदणी संपर्क : (02182) 222220 । मो.7420856688, 9762432655**

## पाटबंधारे विभागाची गळचेपी भुमिका शेतकऱ्यांच्या मुळावर !

# भरत अवताडे यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा



करमाळा(सं.प्र.): तालुक्यातील २४ गावांची वरदायिनी असलेल्या दहिगाव उपसासिंचन योजनेच्या अपूर्ण कामांसाठी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी ११६ कोटी निधी मंजूर करून आणून त्याचे काम डिसेंबर २०२३ मध्ये सुरू केलेले होते. परंतु नोव्हेंबर २०२४ रोजी करमाळा तालुक्यात सत्तांतर झाले आणि त्यानंतर दहिगाव योजनेचे सुरू असलेले काम जानेवारी २०२५ मध्ये बंद पडले. हे बंद पडलेले काम सुरू करावे. या मागणीसाठी आपण पाटबंधारे विभागाला रितसर पत्र दिले होते. काम सुरू न झाल्यास जनआंदोलन उभे करू; असा इशारा दिला होता. परंतु पाटबंधारे विभाग याविषयी गळचेपी भुमिका घेत असून शेतकरी उध्वस्त होण्याची वेळ आलेली आहे. जानेवारी २०२५ मध्ये बंद पडलेले दहिगाव योजनेचे काम एप्रिल २०२५ अखेर सुरू झाले परंतु हे काम पुन्हा एकाच दिवसात गावगुंडांनी येऊन बंद केले. याबाबत तक्रार करण्यात आली परंतु याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. जळीत पाईप प्रकरणात अज्ञातावरती गुन्हा दाखल केलेला होता. परंतु काम बंद पाडणाऱ्या विरूध्द पाटबंधारे विभाग तक्रार करायला पुढे येत नाही. त्यामुळेच सरकारी कामात अडथळा म्हणून गुन्हा दाखल होत नाही. त्यामुळे १६ मे रोजी अर्जुननगर फाटा येथे सकाळी दहा वाजता रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत अवताडे यांनी सांगितले.

## ९६ लाखांच्या अपहाराचा ठपका, ग्रामसेवकासह सरपंचावर गुन्हा दाखल

### माजी सभापती ननवरे यांच्या उपोषणानंतर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : देवळाली ग्रामपंचायतीच्या विकासकामात ९६ लाखांचा गैरव्यवहार केल्या प्रकरणी तत्कालीन ग्रामविकास अधिकारी अंगद लटके व माजी सरपंच प्रेमा जगताप यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात पंचायत समितीचे माजी सभापती गहिनीनाथ ननवरे यांनी वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलनाचा मार्ग अवलंबला होता. विस्तार अधिकारी अविनाश थोरात यांच्या फिर्यादीवरून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सन २०१२ ते २०१५ या काळात हे अपहार प्रकरण घडले. याबाबत अधिक माहिती अशी, की २४ फेब्रुवारी २०१२ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीमध्ये देवळाली ग्रामपंचायत येथे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी अंगद लटके व माजी सरपंच प्रेमा जगताप यांनी संगणमत करून आर्थिक गैरव्यवहार केला; अशी तक्रार माजी सभापती गहिनीनाथ ननवरे यांनी सन २०१७ मध्ये दिली होती. सदर प्रकरणात ९६ लाख १५ हजार ८५८ रुपयाचा अपहार झाल्याची तक्रार करण्यात आली होती. तक्रारीनंतर सदर प्रकरणाची चौकशी सुरू झाली. दरम्यानच्या काळात समितीने पंचायत समिती करमाळा यांचेकडे अहवाल सादर केला. त्यामध्ये लटके व जगताप यांचेकडून ९६ लाख ३८ हजार ९०८ वसुल पात्र होत असल्याचा अहवाल दिला होता. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तत्कालीन सरपंच जगताप यांना कारणे दाखवा नोटीस दिली. त्यांनी विहित वेळेवर कोणताही खुलासा सादर केला नव्हता. सदर प्रकरणात ननवरे यांनी वेळोवेळी तक्रार करूनही गुन्हा दाखल होत नव्हता. अखेर ननवरे हे १ मे रोजी सोलापूर येथे उपोषणास बसले होते. त्यांच्या आंदोलनाची दखल घेऊन सदरचा गुन्हा दाखल केला आहे.


आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



**जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स्** पोंधवडी, ता.करमाळा.

**• गुजरात दर्शन** — कालावधी : दि.५/५/२०२५ ते १४/५/२०२५
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
सहल खर्च : रू.११,०००

**• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.१५/५/२०२५ ते २७/५/२०२५
सहल खर्च रू.३०,५०० (रेल्वे प्रवास ३ एसी)

**• कन्याकुमारी दर्शन** — कालावधी : दि.२/६/२०२५ ते १०/६/२०२५
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
सहल खर्च : रू.१३,८००

**• चारधाम दर्शन** — कालावधी : दि.१३/६/२०२५ ते २८/६/२०२५
सहल खर्च : रू.३५,०००

**• त्रिस्थळी दर्शन यात्रा** — सहल खर्च : रू.१४,८००
श्री काशी विश्वनाथ गया, अयोध्या,प्रयाग
कालावधी : दि.२७/७/२०२५ ते २/८/२०२५

• रेल्वे प्रवास • बस प्रवास • भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय




संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८


## करमाळा येथे १५ ते १७ मे उन्हाळी शस्त्रक्रिया शिबीर

करमाळा(सं.प्र.) : शेटे मॅटर्निटी हॉस्पिटल व लॅप्रोस्कोपी सेंटर, करमाळा यांचे वतीने १५ ते १७ मे या कालावधीत उन्हाळी शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात ५० टक्के सवलतीच्या दरात दुर्बिणीच्या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. यामध्ये कुटूंबनियोजन, गर्भपिशवी काढणे, अंडाशयाच्या गाठी काढणे, वंध्यत्व तपासणी, कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया पलटविणे, गर्भाशयाच्या गाठी काढणे इ. चा समावेश आहे. हे शिबीर शेटे मॅटर्निटी हॉस्पिटल व लॅप्रोस्कोपी सेंटर, कमलादेवी रोड, करमाळा येथे होणार असून, याचा लाभ रूग्णांनी घ्यावा; असे आवाहन डॉ.विशाल शेटे व डॉ.प्रिती शेटे यांनी केले आहे.


**खुली जागा भाड्याने देणे आहे**

करमाळा शहरापासून जवळ, नालबंद मंगल कार्यालय जवळ, नगर बायपास चौक येथील सर्व सोयीनेयुक्त असलेली १ गुंठा ते १०, २०, ८० गुंठ्यापर्यंतची खुली जागा मॉल, शोरुम, गोडावून, छोटे उद्योग, कारखाने, दूध संघ, खते गोडावून, दाळ मिल कोल्ड स्टोरेज इ. सर्व प्रकारच्या उद्योगासाठी योग्य दराने भाडेतत्वावर देणे आहे

जागेची वैशिष्ट्ये : • नगर-करमाळा हायवे पासून २०० फुटावर • ५० फुटी रोड टच • २४ तास लाईटची सोय

संपर्क : मो.नं.8805737388

**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स**

होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर



प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी, पार्टीवेअर साडी, कॉटन साडी, लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर तसेच रेडीमेड ब्लाऊजच्या भरपूर व्हरायटीज मिळतील

टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.

विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल

पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध



पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)

करमाळा शहरात प्रथम सुरू..! Reg no.42433

डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील ( Clinical Cosmetologist & Trichologist )

**पाटील स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक**

उपलब्ध सुविधा

• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, ॲंटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर



• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे



• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे • सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार

पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

# बारावीच्या परीक्षेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा ९५.३२ टक्के निकाल



करमाळा(सं.प्र.): महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा ९५.३२ टक्के निकाल लागला आहे. यामध्ये विज्ञान शाखेचा ९८.५२ टक्के, वाणिज्य शाखेचा ९७.७७ टक्के तर कला शाखेचा ९२.०१ टक्के निकाल लागला आहे.


विज्ञान शाखेमध्ये भक्ती कोंडलकर (७४.६७), सिध्दी व्हरे (७३.५०), विक्रमादित्य कोळेकर (७३.१७) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. वाणिज्य शाखेत मानसी वासानी (९०.६७), अमृता सांगळे (८७.१७), अनुष्का चौगुले (८५.५०) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. कला शाखेमध्ये संजना मारडकर (८८.००), पुजा गोरे (८६.५०), गुलनाज शेख (८२.३३) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी केले.

# बारावीच्या परीक्षेत महात्मा गांधी विद्यालयाची मोनिका पाटील अव्वल



करमाळा(सं.प्र.): बारावीच्या परीक्षेत शहरातील करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा गांधी ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स चा शंभर टक्के निकाल लागला असून मोनिका संतोष पाटील (८८.८३%), हिचा प्रथम तर धनश्री विजय झोळे (८१.६७%) हिचा द्वितीय व पायल बापू ओहोळ (८१.००%) हिचा तृतीय क्रमांक आला आहे. या सोबतच पायल हिने १०० पैकी ९८ गुण मिळवून मराठी विषयात बोर्डात दुसरी येण्याचा बहुमान मिळवला आहे. महाविद्यालयातून बारावीच्या परीक्षेसाठी सर्वाधिक ३२१ विद्यार्थी बसले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने १०० टक्के निकाल लागला आहे. तीनही क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थीनी या सर्वसाधारण कुटूंबातील आणि ग्रामीण भागातील असून साडे येथील मोनिका हिच्या वडीलांचे अकाली निधन झाले आहे तर देवळाली येथील धनश्री ही शेतकरी कुटूंबातील व पायल हिचे वडील सेंट्रींग कामगार आहेत. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले.

# सोनल गौरव कुलकर्णी यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर




करमाळा(सं.प्र.) : केम येथील अबॅकस शिक्षण संस्थेच्या संचालिका सोनल गौरव कुलकर्णी यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र युवा फाऊंडेशनचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. २३ मे ला पुणे येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. सोनल कुलकर्णी यांच्या या यशाबद्दल केम परिसरातून कौतूक होत आहे.


खुशखबर दर सोमवारी मुळव्याध इंजेक्शन (Scelro - Therophy) खुशखबर


फक्त 10,000/- मध्ये पहिल्या पाच पेशंटसाठी मर्यादित !

डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवारी उपलब्ध



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ

डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)



उपलब्ध सुविधा...

● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण

दर गुरुवार व सोमवार

वेळ : सकाळी ९.०० ते १२.००

लोकरे हॉस्पिटल

कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर

(९८५०८५१००५)

मो.9763035862

परिचय

डॉ.विकास देविदास नागरगोजे

मुळव्याध तज्ञ

पदवी : नाशिक

पदवोत्तर : मुंबई



ओपीडीचे वैशिष्ट्ये...

● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा ● प्रभावी औषधी सुविधा ● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग ● आठवड्यातून दोनदा ओपीडी ● पार्किंगची व्यवस्था

सुचना १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.


## चोरीचा सिलसिला सुरू

# खरेदीच्या नावाखाली आनंदी ज्वेलर्स मध्ये चोरी

करमाळा(सं.प्र.) : खरेदी करण्याच्या नावाखाली वेगवेगळ्या वस्तु पाहत चोरी करण्याचा सिलसिला अद्यापही सुरु आहे. येथील आनंदी ज्वेलर्स मधून ३५ ते ४० वर्षे वयाच्या महिलेने सोन्याचे झुमके घेण्याच्या नावाखाली ४६ हजार रूपये किंमतीचे झुमके चोरून नेले आहे. हा प्रकार ६ मे ला दुपारी पावणेतीनच्या सुमारास घडला आहे. यात अभिजीत अशोक दोशी (रा.मेनरोड, करमाळा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ६ मे ला नेहमी प्रमाणे आम्ही सकाळी दहा वाजता दुकान उघडले होते. दुपारी अडीचच्या सुमारास ३५ ते ४० वयाची महिला ग्राहक दुकानात आली. तिने झुमके घेण्याच्या नावाखाली अर्धा तोळा वजनाचे सोन्याच्या झुमक्याची जोडी हातचलाखीने तिच्या पिशवीत टाकल्याचे सिसीटीव्ही कॅमेरात दिसत आहे. या सोन्याच्या झुमक्याची किंमत ४६ हजार रूपये आहे. तिने दागिणे घेण्याच्या नावाखाली हे झुमके चोरून नेले आहे. पोलीसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

करमाळा शहरातील विविध दुकानामध्ये काही महिला येतात. किरणा सामान असो किंवा मेडिकल दुकान असो किंवा हॉटेल असो. या ठिकाणी विविध वस्तू देण्याच्या बहाणाने काही महिला हातचलाखीने वस्तू चोरून नेत आहेत. हा प्रकार वाढला असून पोलीसांनी या महिलांना पकडून त्यांचेवर कारवाई करावी; अशी व्यापाऱ्यांची मागणी आहे.

# म.गांधी विद्यालयाचे सेवानिवृत्त सहशिक्षक सालोमन साने यांचे निधन



करमाळा(सं.प्र.): महात्मा गांधी विद्यालयातील सेवानिवृत्त सहशिक्षक सालोमन मोझेस साने (वय-५९) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ असा परिवार आहे. साने सर हे मुळचे सोलापूरचे होते. नोकरीनिमित्त ते करमाळा शहरात स्थायिक झाले. म.गांधी विद्यालयातील तांत्रिक विभागात ते सहशिक्षक म्हणून कार्यरत होते. शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांची विद्यालयात ओळख होती. विद्यालयातून ते २०१३ साली सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती नंतर ते करमाळ्यातच रहात होते.


महाराष्ट्रात प्रथमच...

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?

बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा

आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...

आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !



२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर

एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस

सुभद्रा पॉवर सोल्युशन्स

प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337

श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719

शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

स्थलांतर.. ३० वर्षापासून आपल्या अखंड सेवेत.. स्थलांतर..

शांतिसागर

हे दुकान..... बँगल्स स्टोअर

स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा येथे चालू आहे.

बांगड्याचे होलसेल व्यापारी



आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या लग्नासाठी लागणाऱ्या बांगड्या होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण !

संपर्क : मो.नं.9766075378

पत्ता : स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा

# मेहता स्वीट्स्

नमकीन आणि मिठाई



## आता नवीन रुपामध्ये

नमकीन | मिठाई | आईस्क्रीम
कोल्ड्रिंक्स | डेअरी प्रोडक्टस्

* * * * * * * * * * * * * * * * * * *

+91 8412-812-106
www.mehtasweets.com
मेन रोड, जे. एच. कलेक्शन शेजारी, करमाळा

# कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय

करमाळा., जि.सोलापूर

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६



प्रशालेची खास वैशिष्ट्ये

## इ.5 वी ते 9 वी सेमी मोफत प्रवेश !

- इ.१० वी निकालाची वैभवशाली परंपरा
- तज्ञ व अनुभवी शिक्षक वृंद
- गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व वह्या वाटप
- नवोदय, स्कॉलरशीप, गणित संबोध, विज्ञान संबोध, चित्रकला, ग्रेड परीक्षा, खेळाचे मार्गदर्शन अशा विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन.
- प्रशालेची इमारत व परिसर सीसीटीव्हीच्या कक्षेत.
- मुलींच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथक, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समितीचे प्रभावी आयोजन
- इ.१० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, रात्र अभ्यासिका., गणित, सायन्स, इंग्रजीचे रोज जादा तास तसेच उन्हाळी सुट्टीत व्हॅकेशन.
- ई-लर्निंग सुविधा (डिजीटल वर्ग)
- सुसज्ज इमारत व भव्य खेळाचे मैदान

संपर्क

श्री.सुनील जाधव (मुख्याध्यापक) मो.9921451011
श्री.रविंद्र शिंदे (क्लार्क) मो.8605047554
श्री.अर्जुन जगदाळे सर मो.9881024867
श्री.विजय धनवे सर मो.9423333967



# चिमुकल्यांच्या

आनंदात भर पडेल असे गिफ्ट वाढदिवसाला द्या..!

- इलेक्ट्रीक कार
- इलेक्ट्रीक बाईक

# Shweta

Gift & Toys

श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

शुध्द..स्वच्छ..स्वादिष्ट..नी रुचकर...

NOW OPEN

# चिवटे फुड सेंटर

## व्हेज चायनिज

प्युअर व्हेज



व्हेज मनंच्युरियन
पनीर चिल्ली
सोयाबिन रोस्ट
व्हेज हाका नुडल्स
व्हेज शेजवान राईस
व्हेज मनचाव सुप

एक वेळ अवश्य भेट द्या !

वेळ - दुपारी ३ ते रात्री ११ पर्यंत.

श्रीदेवीचामाळ रोड, कृष्णाजीनगर, करमाळा.
मो.नं.8888147005



कै.सौ.सविता अर्जुन जगदाळे

# ६ वे पुण्यस्मरण

केले कष्ट जन्मभर
थाटला सुखाचा संसार
करूनी गेलीस पोरके आम्हांस
तुझ्याविना सुने घरदार

सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त
तुझ्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

**सहावे पुण्यस्मरण :** दि.१५/५/२०२५, **स्थळ :** खांबेवाडी, ता.करमाळा.

**शोकाकुल : जगदाळे व दगडे परिवार, खांबेवाडी**

यशोदीप प्रा.लि;
आपल्या सेवेत घेऊन आलो आहोत..
"सर्वसोयीनेयुक्त"

# यशोदीप मंगल कार्यालय

**पत्ता : यशोदीप नगर, निलज रोड, करमाळा.**
प्रोप्रा : संदीप दिलीपराव बोकन

दैवत.. आई-वडिलांचा शुभ-आशिर्वाद




**वैशिष्ट्ये**
- शहरापासून ५ मिनीटाच्या अंतरावर
- शांत व निसर्गरम्य वातावरण
- प्रशस्त डायनिंग हॉल
- सुसज्ज बैठक व्यवस्था
- भव्य ४ एकर पार्किंग व्यवस्था
- सुसज्ज सहा रूम
- संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेरा
- छोट्या कार्यक्रमासाठी छोटा हॉल उपलब्ध.

बुकींग सुरू

एकदा येवून तर पहा.. आपण सुध्दा म्हणताल..
मंगल कार्यालय म्हणजे... आपलं.. यशोदीपचं !
आपल्या लाडक्यांसाठी.. आपलं हक्काचं..
आपलं 'यशोदीप मंगल कार्यालय' !

## सर्व प्रकारच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.

- लग्न
- वाढदिवस
- नामकरण
- साखरपुडा
- स्वागत समारंभ
- रिसेप्शन
- गेट टुगेदर
- डोहाळे जेवण
- बैठक, मिटींग

**संपर्क : यशोदीप ज्वेलर्स, दत्तपेठ, करमाळा. (9405713769, 9423069349)**

---



धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित
College Code : 1384

# श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.

ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !

**G.N.M. डिप्लोमा कोर्स**

**प्रवेश देणे सुरू**

- **कालावधी :** ३ वर्षे
- **शैक्षणिक पात्रता...** १२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)

**मान्यताप्राप्त..**
- महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
- महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई

- १००% नोकरीची हमी
- सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
- फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
- जॉब प्लेसमेंट
- हॉस्टेल सुविधा
- हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
- इंग्लिश स्पीकींग क्लासेस



**सुविधा...**
- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
- मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
- प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
- सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
- अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
- एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.

**पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२११५४७, ९५४५६२०१११**

---

२४ तास आपल्या सेवेत

## मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.

**डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील** M.B.B.S. (Gen.Physician)
यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी

**सुविधा :** ॲडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान
मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ

टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा

तपासणी फी फक्त Rs.100/-

**पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३९५१३**

# समर्थ डाळ मिल

शेतकरी ते थेट ग्राहक

आरोग्यदायी नैसर्गिक(ऑरगॅनिक) विना पॉलीश

**हरभरा, तुर, मुग, उडीद डाळ करून मिळेल.**

टीप : सर्व डाळी होलसेल दरात मिळतील.

**पत्ता : बायपास रोड, हॉटेल राजयोग समोर, करमाळा.**

प्रोप्रा : घोलप अ‍ॅन्ड सन्स (8637795714)



डॉ.नायकुडे यांचे **डोळ्यांचा दवाखाना**

# श्रीजय नेत्र रुग्णालय

डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे
M.S. Netra (Ayu) (Gold Medalist)
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
Reg no.1-77199-A

- मोतीबिंदू(Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
- डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
- Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध

इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते रात्री ९ (रविवार - सकाळी १० ते दु.२ पर्यंत)**

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

**रिसेप्शनीस्ट नेमणे आहे. गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा !**


## देवळाली येथे सर्वरोग निदान शिबीरात ७८० रूग्णांची तपासणी



करमाळा(सं.प्र.) : देवळाली येथील श्री नागनाथ महाराज यात्रेनिमित्त शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष व शिवसेना युवा तालुका अध्यक्ष राहुल कानगुडे यांचे वतीने घेण्यात आलेल्या सर्वरोग निदान शिबीरात एकूण ७८० रूग्णांची तपासणी करून तीन लाख रूपयांची औषधे रूग्णांना मोफत वाटप करण्यात आली. रूग्णांची तपासणी करण्यासाठी तालुका वैद्यकिय अधिकारी तसेच उपजिल्हा रुग्णालय करमाळा व मातोश्री गुंगुबाई शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्टच्या डॉक्टरांनी परिश्रम घेतले.

या शिबीराचे उद्घाटन संभाजी ढेरे व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांचे हस्ते झाले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, माजी सभापती गहिणीनाथ ननवरे, सरपंच पोपट बोराडे, औदुंबर गणेशकर, राजेंद्र घळके, सुनील आवटे, सुधीर आवटे, गोरख पवार, नागेश दामोदरे, नागेश चेंडगे, प्रफुल्ल दामोदरे, किसन चांदणे, अशोक गायकवाड, नितीन कानगुडे, संतोष कानगुडे, तानाजी गुटाळ तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## बारावीच्या परीक्षेत नेताजी सुभाष महाविद्यालयाचा ९६.६६ टक्के निकाल



करमाळा(सं.प्र.): बारावीच्या परीक्षेत केतूर नं.२ येथील नेताजी सुभाष कनिष्ठ महाविद्यालयाचा ९६.६६ टक्के निकाल लागला आहे. यशोदा विठ्ठल खाटमोडे (७९.१७%), किरण दादा मांढरे (७५.१७ %), गीतांजली महादेव काळे (७०.३७%) यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन प्राचार्य के.एल.जाधव, पर्यवेक्षक बी.जी.बुरूटे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ॲड.संतोष निकम, उपाध्यक्ष प्रशांत पांढरे, सरपंच सचिन वेळेकर व केतूर ग्रामस्थांनी केले.


# अक्षर संस्कार क्लास व रूबिक क्युब

**(हस्ताक्षर सुधारणा क्लास)**

**• इंग्लिश प्रिंट राईट व मराठी देवनागरी •**

टीप : १००% अक्षर सुधारणार, मेहनत करण्याची तयारी हवी.

टीव्ही व मोबाईल पासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी व व्यस्त ठेवण्यासाठी तसेच एकाग्रता वाढवण्यासाठी **रूबिक क्युब**

**उपलब्ध कोर्सेस :** अबॅकस, वैदिक मॅथ, जनरल नॉलेज

**पत्ता : मुथा अबॅकस, वैदिक मॅथ्स अकॅडमी, मंगळवारपेठ, करमाळा.**

संपर्क : मो.9730505153



**डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.)** यांचा

# अनुजा

## दातांचा दवाखाना






वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

**उपलब्ध सुविधा...**






- स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
- पोर्टेबल एक्स-रे
- वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
- लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
- दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
- वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
- दात काढणे
- शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
- इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
- दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
- डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
- पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
- जबड्याच्या आजारांचे निदान
- रूट कॅनल ट्रीटमेंट
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
- पुढील दातांमधील गॅप बंद करणे
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
- दात पांढरे/शुभ्र करणे
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
- मुख कर्करोग निदान

**कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.**

# शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस



प्रोप्रा : अमरजित साळुंके (मो.९८२३३७१४५७)

फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर., सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे., एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे अधिकृत विक्रेते

• नवीन पत्ता •

बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.



# विघ्नहर्ता इंटिरीयर

प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम

# देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर

• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका

प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर


## श्रीराम मंदिरास सकल मुस्लिम समाज व कलाम फाउंडेशनकडून फ्रीज भेट



करमाळा(सं.प्र.): एपीजे अब्दुल कलाम फाउंडेशन आणि करमाळा तालुक्यातील सकल मुस्लिम समाजाच्या वतीने नेहमीच हिंदू-मुस्लिम ऐक्य जोपासण्याचा प्रयत्न केले जातात. यात अजून एक भर घातली गेली आहे. या दोन्ही संघटनेच्या वतीने शहरातील वेताळपेठेतील श्रीराम मंदिरास पाण्याचा फ्रीज भेट देण्यात आला. यापूर्वी या संघटनांनी मंदिरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून दिले होते. यावेळी मंदिर परिसरात नव्याने घेण्यात आलेल्या बोअरवेलचे पूजनही करण्यात आले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक रणजित माने म्हणाले, की करमाळा तालुक्यातील धार्मिक ऐक्य प्रेरणादायक आहे. यापूर्वी ज्या ठिकाणी काम केले, तिथेही असेच सौहार्द अनुभवले. शहरातील मुस्लिम समाजाने श्रीराम मंदिरासाठी केलेले कार्य कौतुकास्पद आहे.

### सीना-कोळगाव आवर्तनामुळे शेतकऱ्यांना दिलासा

## आमदार नारायण पाटील यांनी दिले दुसरे आवर्तन





करमाळा(सं.प्र.) : उजनीची पाणी पातळी खालावली असलीतरी कोळगाव धरणातील पाणी पातळी बऱ्यापैकी असताना आमदार नारायण पाटील यांनी कार्यतत्परता दाखवून पूर्व भागातील गौंडरे, आवाटी, नेरले, सालसे, कोळगाव आदी गावातील संभाव्य पाणी टंचाई, गुरासाठी चारा टंचाई दूर करण्यासाठी वेळीच पाऊल उचलून उन्हाळी आवर्तन देण्याच्या सूचना संबंधित विभागास केली. यामुळे ३ मे रोजी तालुक्याचे युवा नेते व जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील यांचे हस्ते सीना-कोळगाव उपसासिंचन योजनेचे दुसरे आवर्तन चालू करण्यात आले. आदिनाथचे संचालक आबासाहेब अंबारे, सीना-कोळगाव अभियंता कांबळे, बप्पा आतकरे, महादेव धोंडे, महेश पाटील, सतीश रूपनवर, जयराज कदम, सोमनाथ येवाळे, नागनाथ धोंडे, तात्या तांबे, गणेश पाटील उपस्थित होते. गौंडरे, आवाटी,नेरले, कोळगाव, सालसे भागातील शेतकरी ऐन उन्हाळ्यात पाणी सुटल्याने समाधानी झाले आहेत. सीना-कोळगाव उपसा सिंचन योजनेतून या अगोदरही एक आवर्तन देण्यात आले होते. ही योजना पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी पंपहाऊस तसेच मुख्य कालवा दुरूस्तीसाठीही आमदार नारायण पाटील यांनी मागणी केली आहे.


SBI Life
Apne Liye. Apno Ke Liye.

# स्टेट बँक ऑफ इंडिया कंपनी ग्रुप मध्ये नोकरी करण्याची सुवर्णसंधी..!

## Walk - in - Inerview

### डेव्हलपमेंट मॅनेजर (जागा - ५)

- शिक्षण अट : कोणत्याही शाखेचा पदवीधर
- अनुभव : कमीत कमी १ वर्ष
- पगार : ३ लाख ते ५.५० लाख वार्षिक



### बिझनेस असोसिएट (जागा - १०)

- शिक्षण : १२ वी
- सुविधा : सर्व सरकारी नोकरी सुविधा

जॉब लोकेशन : करमाळा.

Adress

**SBI Life Insurance**

Krushnaji nagar, Back side of S.V.Mall, Karmala.

**Contact : 7020708786**



शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

# चिवटे उपहारगृह

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

एकवेळ अवश्य भेट द्या..!

राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम



# प्रियंका आय केअर हॉस्पीटल

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


मस्कर अॅग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी

आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

## कुंटनखाना चालविणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : स्वत:च्या शेतात कुंटनखाना चालविण्यासाठी बाहेरील तीन महिलांना आणून खोल्यामध्ये डांबून अनैतिक व्यवहारासाठी व लैंगीक स्वैराचारासाठी वापर करणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार वीट येथे ४ मे ला दुपारी दीड वाजता उघड झाला आहे. यात पोलीसांनी छापा मारून ही कारवाई केली आहे. यात पोलीस हवालदार महेश डोंगरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की वीट येथे बेकायदेशीर कुंटनखाना चालविला जात असल्याची माहिती समजल्यावर आम्ही एक बनावट गिऱ्हाईक तेथे पाठविले. त्यानंतर सदर व्यवसायाची शहानिशा करून छापा टाकला असता वीट येथे गट नं.२४० मध्ये खोल्या बांधून संतोष रोहिदास जगदाळे (रा.वीट) याने दोन खोल्यामध्ये दोन महिलांना डांबून ठेवल्याचे दिसून आले. तसेच सुरूवातीला बनावट गिऱ्हाईकास आढळून आलेली एक महिला अशा तीन महिलांना तेथे अनैतिक व्यापारासाठी व लैंगिक स्वैराचारासाठी आणून ठेवल्याचे दिसून आले. या प्रकरणी पोलीसांनी जगदाळे याचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

## पिकअपची मोटारसायकलला धडक

करमाळा(सं.प्र.) : रस्त्यावरून चालत मोटारसायकलवरून जात असताना समोरून येणाऱ्या पिकअपने मोटारसायकल स्वारास जोराची धडक दिल्याने मोटार-सायकलस्वार गंभीर जखमी झाला आहे. हा प्रकार संगोबा येथे २७ मार्च ला रात्री आठ वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीसांनी ३ मे ला गुन्हा दाखल केला आहे. यात भारत लक्ष्मण नगरे (रा.बोरगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २७ मार्च २०२५ ला रात्री आठ वाजता माझा भाऊ रामा लक्ष्मण नगरे हा मोटारसायकलवरून संगोबा मंदिरा जवळून येत असताना समोरून येणाऱ्या पिकअप क्र.एमएच २५ पी ५४८० च्या चालकाने जोराची धडक देऊन त्यास गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर करत आहेत.

## किरकोळ कारणावरून तिघांकडून दोघींना मारहाण

करमाळा (सं.प्र.) : आमच्या घरासमोर कचरा का टाकला.. असे म्हणून तिघाजणांनी शिवीगाळ करून लोखंडी गजाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. हा प्रकार जेऊर येथे ५ मे ला सकाळी दहा वाजता घडला आहे. या प्रकरणी रूपाली नंदू जाधव (रा.जेऊर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ५ मे ला सकाळी दहा वाजता मी माझ्या आईच्या घरी असताना घराशेजारी कचरा का टाकला.. असे म्हणून शेजारचे सारीका माने, मोनिका माने व बाळू माने यांनी हातातील लोखंडी गजाने डोकीत मारहाण करून जखमी केले आहे. तसेच माझी भावजय ही सोडविण्यास आली असता तिलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रणजित माने हे करत आहेत.

## महिलेच्या विनयभंग प्रकरणी सहा जणाविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : महिलेचा विनयभंग केल्या प्रकरणी सहा जणाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार जेऊर येथे ५ मे ला सकाळी दहाच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी ४० वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ५ मे ला सकाळी दहाच्या सुमारास मी माझ्या घरासमोर भांडे घासत असताना रूपाली जाधव, शंकर माने, विठ्ठल जाधव, रोहित माने, मोनिका माने, सखुबाई जाधव अशी सर्व रा.जेऊर आले व त्यांनी तु आमच्यावर सारख्या पोलीसात केस करते.. असे म्हणून माझ्या केसाला धरून लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून माझा विनयभंग केला आहे. तसेच माझ्या मुलीलाही मारहाण करून माझ्या अंगावरील कपडे फाडले आहे. या प्रकरणी पोलीसांनी सर्वांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## किरकोळ कारणावरून चौघांकडून दांम्पत्यास मारहाण

करमाळा(सं.प्र.) : अंत्यविधीला एकाच गाडीतून जात असताना चुकीचा रस्ता का सांगतो.. असे म्हटल्यावरून झालेल्या शिवीगाळी नंतर वांशिबे चौकात दांम्पत्यास चौघांकडून बेदम मारहाण करण्यात आली आहे. हा प्रकार ३ मे ला पहाटे चार वाजता घडला आहे. यात सोमनाथ शेटीबा जाधव (रा.झरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २ मे ला दुपारी दोन वाजता पुणे येथील नातेवाईकांच्या अंत्यविधीसाठी जात असताना मी स्वत: गाडी चालवत होतो. त्यावेळी बाबासाहेब नारायण शेलार याने चुकीचा रस्ता सांगितला. त्यावेळी मी त्याला तुला माहित नाहीतर चुकीचा रस्ता का सांगतोस असे म्हटल्या वर त्याने मला शिवीगाळ केली. परंतु अंत्यविधीस जायचे असल्यामुळे मी त्यास काही बोललो नाही. अंत्यविधी उरकून ३ मे ला पहाटे चारच्या सुमारास मी वांशिबे चौकाच्या पुढे आल्यानंतर पाठीमागून एक चारचाकी गाडी ओव्हरटेक करून पुढे गेली व त्यांनी गाडी आडवी लावली. त्यामुळे मी माझी गाडी उभा केली असता त्या गाडीतून बाबासाहेब शेलार, लखन शेलार, नूतन शेलार व सुप्रिया शेलार (सर्व रा.झरे) हे उतरून आले व त्यांनी रॉडने माझ्या डोक्यात मारहाण केली. माझी पत्नी रेणुका ही भांडण सोडविण्यास आली असता तिलाही मारहाण करण्यात आली. या प्रकरणी पोलीसांनी चौघाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.


## विवाहितेच्या छळ प्रकरणी सासरच्या पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : माहेरावरून कर्ज फेडण्यासाठी पैसे घेऊन ये.. या कारणावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या सासरच्या पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार भांडूप (जि.ठाणे) येथे घडला आहे. या प्रकरणी जेऊर येथील मिनाक्षी सुनील नाईक हिने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की सन २०१२ मध्ये माझे सुनील प्रकाश नाईक (रा.भांडुप) यांचेशी लग्न झाले. लग्नानंतर बरेच दिवस व्यवस्थित चालू असताना फेब्रुवारी २०२५ मध्ये घराचे कर्ज फेडण्यासाठी माहेरावरून पैसे घेऊन ये.. या कारणावरून पती सुनील नाईक, सासा उषा नाईक व आशा नाईक, दीर विशाल नाईक, नणंद निशा शिरसेकर या सर्वांनी शारिरीक व मानसिक छळ केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


साई
स्टील रेलिंग
& किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर


रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
fastrack
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.

# गांडुळ खत निर्मिती - श्रीराम महिला बचत गटाचा उपक्रम

करमाळा : महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असतात, असे बोलले जाते. पण त्याची प्रत्यक्ष प्रचिती करमाळा शहरातील महिलांच्या कृतीतून आलेली आहे. करमाळा येथील श्रीराम महिला उद्योजक बचत गटाने गांडुळ खत निर्मितीचा प्रकल्प उभा करून त्यांचे गांडुळ खत ग्राहकांपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. नव्या क्षेत्रात या महिलांनी यशस्वी पर्दापण केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

दौंड येथील सामाजिक कार्यकर्ते जयराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा शहरातील दहा महिलांनी एकत्रित येऊन श्रीराम महिला उद्योजक बचत गट स्थापन केला आहे. या बचत गटाच्या अध्यक्षा म्हणून संगीता वनारसे, उपाध्यक्ष म्हणून अश्विनी सुर्यवंशी व संगीता नष्टे तर सचिव म्हणून मिनाक्षी गुंजेगावकर या काम पाहत आहेत. या महिलांनी कर्जत रस्त्यावर



शहरातील वेगवेगळ्या विभागातील आम्ही दहा महिला एकत्र येऊन सामाजिक कार्यकर्ते जयराम गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली श्रीराम बचत गट उभा केला आहे. यासाठी आम्ही दरमहा पाच हजार रूपये भाड्याची जागा घेतली असून त्यात २८ बेडवर गांडुळ खत निर्मितीचा प्रयोग यशस्वी केला आहे. यामध्ये एका बेडला तीन किलो ऑस्ट्रोलियन गांडुळ टाकले असून शेणखत व माती आणि पाणी याचे योग्य नियोजन करून गांडुळांची वाढ केली असून त्यातून एकदम उत्तम प्रतीचे गांडुळ खत तयार झाले असून सदरचे गांडुळ खत २० रू. किलो तर गांडुळ ५०० रू. किलो प्रमाणे विक्रीला ठेवले आहे.

...सौ.संगीता वनारसे (मो.७०३८७१९८३४)
(अध्यक्षा, श्रीराम महिला उद्योजक बचत गट)



नागोबा मंदिराजवळ खाजगी जागा भाड्याने घेऊन १ मार्च २०२५ गांडुळ खताचे २८ बेड उभारले आहेत. त्याची योग्य ती निगा राखून त्यांचे खत नुकतेच बाजारात विक्रीसाठी पूर्ण झाले असून, ग्राहकाकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

***

## दि बारामती सहकारी बँक लि;
शाखा-करमाळा

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: करमाळा शहर व तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कै.शकुंतला भानुदास गायकवाड रा.कुंकूगल्ली, करमाळा. ता.करमाळा, जि.सोलापूर या आमचे बँकेच्या करमाळा शाखेच्या खातेदार आहेत. बँकेच्या करमाळा शाखेत त्यांचे सेव्हिंग्ज खाते व मुदत ठेव आहे. या सर्व खातेसाठी त्यांनी त्यांचा मुलगा रूपेश भानुदास गायकवाड याची वारस म्हणून नोंद केलेली आहे. दि.१६/६/२०२० रोजी शकुंतला भानुदास गायकवाड यांचे निधन झाले आहे. या खात्याचे वारस रूपेश भानुदास गायकवाड यांनी कै.शकुंतला भानुदास गायकवाड यांचे बँकेतील सेव्हिंग्ज खाते व मुदत ठेव खातेवरील सर्व रक्कम त्यांना मिळणेसाठी बँकेत अर्ज दिलेला आहे. सोबत त्यांनी कै.शकुंतला भानुदास गायकवाड यांचा मृत्युचा दाखला व त्यांना ते एकमेव वारस असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे. कै.शकुंतला भानुदास गायकवाड यांचे बँकेतील वरील ठेवीबाबत इतर कोणी वारस असल्यास किंवा याबाबत कोणाची काही हरकत वा तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसात बँकेत येवून आपले लेखी म्हणणे सादर करावे. या १५ दिवसात कोणाची काही हरकत वा तक्रार प्राप्त न झाल्यास बँक कै.शकुंतला भानुदास गायकवाड यांचे बँकेतील ठेवीची रक्कम अर्जदार रूपेश भानुदास गायकवाड यांना अदा करेल व नंतर या ठेवीबाबत कोणाची काहीही तक्रार चालणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

शाखाधिकारी, दि बारामती सहकारी बँक लि;
शाखा-करमाळा

# अनंत संघर्षानंतर सेवानिवृत्ती




करमाळा : 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा।' असे एक गीत प्रसिध्द आहे. परंतू या गीतापेक्षाही महिलांना फार मोठा संघर्ष करून जीवन जगावे लागते. एवढंच नाहीतर आपल्या जीवनाचे सार्थक करण्यासाठी जीवाची बाजी लावावी लागते. याची अनुभूती पोथरे येथील शामल सुभाष रंदवे-राऊत यांच्या वाटचालीतून आली आहे.

शामलताई रंदवे यांचे माहेर श्रीगोंदा हे असून १९७६ ला त्यांचा विवाह पोथरे येथील सुभाष धोंडिबा रंदवे यांचे बरोबर झाला. रंदवे परिवाराची परिस्थिती नाजूक असल्याने शामलताईला पहिल्या दिवसापासून संघर्ष करावा लागला. काही दिवस मजुरी करावी लागली तर काही दिवस कुक्कूटपालन करावे लागले. परंतू सुरूवातीपासून हुशार व चौकसदार असल्याने त्यांची पहिली ओळख करमाळा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते कै.डॉ.पानाचंद गांधी यांचे बरोबर झाली. त्यानंतर त्यांनी मागे पाहिलेच नाही. डॉ.गांधी यांचे माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव, बाबा आमटे तसेच प्रमोद उर्फ बाबा झिंजाडे यांच्या ओळखी झाल्या. त्यातूनच त्यांनी महात्मा फुले समाजसेवा मंडळाकडे आठ वर्षे काम केले. अंगणवाडी सेविका, बचत गट, निरामय रचनात्मक संस्थेचे काम केले. या अनुभवाच्या जोरावर सन २००१ पासून पोथरे येथील अंगणवाडीच्या मदतनीस म्हणून त्यांनी काम सुरू केले. या दरम्यान करमाळा येथील व्होटकर हॉस्पिटलमध्ये नाईट ड्युटी म्हणूनही सलग पाच वर्षे काम केले. तसेच श्रीगोंदा होमगार्ड मध्येही त्यांनी चार वर्षे काम केले आहे. या कालावधीत त्यांनी दिंडोरी येथील शाम आष्टेकर यांचे हॉस्पिटलमध्ये एक महिना राहून बॉडी मसाजचे प्रशिक्षण घेतले आहे. यानुसार गरजूंवर त्या उपचारही करतात. रोजीरोटीच्या कामाबरोबरच समाजातील गरजू घटकांना मदत करण्याच्या दृष्टीने त्यांचे मोठे योगदान आहे. याबरोबरच बचत गट पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. त्यामध्ये त्यांच्या अनेक गीतांचा समावेश आहे.

या सर्व वाटचालीत त्यांचे पती सुभाष रंदवे तसेच मुलगा संतोष व मुली कु.सारीका व सौ.रूपाली यांचे पाठबळ मिळाले आहे. यापुढे स्वत:चे घर उभा करून जास्तीत जास्त सामाजिक काम करण्याचा त्यांचा मानस आहे.

# माजी सरपंच शिवाजी टेकाळे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : पांगरे येथील ग्रामपंचायतीचे सलग २० वर्षे सरपंच म्हणून उत्कृष्ट कारकिर्द असणारे शिवाजीराव (आबा) टेकाळे (वय-६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पांगरे गावात सामाजिक कार्यात ते आघाडीवर होते. सलग २० वर्षे सरपंच म्हणून ते कार्यरत होते. सध्या त्यांचे चिरंजीव महादेव टेकाळे हे विद्यमान उपसरपंच आहेत. टाटा कंपनीचे कोल्हापूर विभागाचे विपनन अधिकारी भैरवनाथ टेकाळे व व्यावसायिक गिरीश टेकाळे यांचे ते वडील होते.

जमीन विकणे आहे
करमाळा-पुणे रोड वर
रोडटच असलेली
दीड एकर (५४ गुंठे)
जमीन योग्य किंमत मिळाल्यास
त्वरीत विकणे आहे
संपर्क
मो.9145436562

चारभुजा पॅलेस
राजस्थान ढाबा


शुध्द शाकाहारी
राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात, हरियाना, पंजाब, कर्नाटक के सभी ड्रायव्हर भाईको हाथ जोडकर विनंती है की.. सेवा करने का मौका आवश्यक दे..!
आपका अपना प्रिय दोस्त.. हरिष चौधरी
पत्ता : नेहा पेट्रोलियम के पास, खडकेवाडी, ता.करमाळा
करमाळा से ७ किमी खडकेवाडी फाटा ओर जेऊर से १० किमी

श्रीकांत इलेक्ट्रीकल्स & एसी सर्व्हीस
सावंतगल्ली, करमाळा.
एसी सर्व्हीस व मेंटनन्सची सर्व कामे केली जातील.
(प्रोप्रा : शिवाजी वीर) मो.9423333956, 7588482356, 7588392837




**दि करमाळा अर्बन को-ऑप बँक लि; करमाळा ता.करमाळा, जि.सोलापूर.**

● संचालक मंडळ निवडणूक २०२४-२५ ते २०२९-३० ●

## करमाळा भूषण स्व.गिरधरदासजी देवी प्रणित

# नागरीक संघटना जनहित पॅनल



## मतपत्रिका नमुना

### ● सर्वसाधारण प्रतिनिधी मतदार संघ ●

| क्र. | उमेदवाराचे नाव | निशाणी | क्र. | उमेदवाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कटारिया जितेश रणजित | बॅटरी टॉर्च | ८ | पिंजारी मलिक दस्तगीर | कपबशी |
| २ | काझी कलीम अब्दुलरशीद | बॅटरी टॉर्च | ९ | भणगे मोहिनीराज माधवराव | बॅटरी टॉर्च |
| ३ | घोडेगावकर चंद्रशेख मल्लीकार्जुन | शिट्टी | १० | लोंढे ब्रम्हदेव ज्ञानदेव | सफरचंद |
| ४ | घोलप सुनिल रामभाऊ | बॅटरी टॉर्च | ११ | वाशिंबेकर अभिजीत अनिल | बॅटरी टॉर्च |
| ५ | देवी अनुज कन्हैयालाल | बॅटरी टॉर्च | १२ | सोळंकी प्रकाश मोतीलाल | बॅटरी टॉर्च |
| ६ | देवी कन्हैयालाल गिरधरदास | बॅटरी टॉर्च | १३ | क्षीरसागर ताराबाई रामचंद्र | बॅटरी टॉर्च |
| ७ | दोशी यशराज राजकुमार | बॅटरी टॉर्च | | ( प्रत्येक मतदारास १०(दहा) मते देण्याचा अधिकार आहे ) | |

### ● इतर मागासवर्ग प्रतिनिधी मतदार संघ ●

| क्र. | उमेदवाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|
| १ | गानबोटे दिलीप गणपत | तुतारी |
| २ | चुंबळकर चंद्रकांत पांडुरंग | बॅटरी टॉर्च |
| ३ | पिंजारी मलिक दस्तगीर | कपबशी |

( प्रत्येक मतदारास १(एक) मते देण्याचा अधिकार आहे )

### ● अनुसूचित जाती/जमाती प्रतिनिधी मतदार संघ ●

| क्र. | उमेदवाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|
| १ | कांबळे वंदना सुनील | बॅटरी टॉर्च |
| २ | वाघमारे सदाशिव विठ्ठल | सनई |

( प्रत्येक मतदारास १(एक) मते देण्याचा अधिकार आहे )

### ● महिला राखीव प्रतिनिधी मतदार संघ ●

| क्र. | उमेदवाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|
| १ | करंडे मीना अशोक | बॅटरी टॉर्च |
| २ | घोलप नंदिनी सुहास | विमान |
| ३ | जाधव प्रमिला प्रदीप | बॅटरी टॉर्च |

( प्रत्येक मतदारास २(दोन) मते देण्याचा अधिकार आहे )

**बॅटरी टॉर्च** चिन्हा समोर फुली मारून
**करमाळा भूषण**
**स्व.गिरधरदासजी देवी प्रणित नागरीक संघटना जनहित पॅनलच्या**
सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करा !

**मतदान :** रविवार दि.११/५/२०२५ रोजी सकाळी ८ ते ४ वाजेपर्यंत

### मतदानाचे ठिकाण

● महात्मा गांधी विद्यालय करमाळा. (१ ते ३००० पर्यंत) ● भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर न.पा.प्राथमिक शाळा, करमाळा.(३००१ ते ६२०९ पर्यंत)
● जि.प.प्राथ.शाळा, जेऊर., ता.करमाळा. ● जि.प.प्राथ.शाळा, कंदर ● जि.प.प्राथ.शाळा, केत्तूर, ता.करमाळा.

मुद्रक : माऊली ग्राफिक्स, करमाळा. प्रकाशक : श्री.महादेव अजिनाथ फंड